ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

Golden Research Thoughts

परंपरागत ग्राम व्यवस्था आणि गांधीचे ग्राम व्यवस्थेवरील विचार

डॉ.व्ही.एस देसले [१] , प्रा. विजय कौतीकराव देसले[२]
[१]कै.नान्हाभाउ म.तु.पाटील कला महाविद्यालय मारवड ता.अमळनेर जि.जळगांव .
[२]श्रीमती वि.उ.पाटील महाविद्यालय साक्री. ता.साक्री जि.धुळे.



प्रस्तावना:-

भारतात प्राचिन काळापासून ग्राम व्यवस्थेचा उगम झालेला दिसतो ग्राम व्यवस्थेत पिढी-दरपिढी हळु हळु विकास होत गेला व ग्राम व्यवस्थेला ऋग्वेद काळातच सुवर्णकाळ प्राप्त झाला होता. स्वयं:पुर्ण खेडी निर्माण झालेली होती. संपुर्ण भारतात अनेक सत्ता प्रस्थापित झाल्यात मात्र एकही सत्ता ग्राम व्यवस्था विस्कळीत करु शकली नाही. या घटकांचा अभ्यास महात्मा गांधीनी पुर्णताह: केला असल्यामुळे त्यांनी आपली चळवळ खेडयापासून करण्याचे ठरविले. मुळात ब्रिटीश शासन भारतातील संपुर्ण खेडयांपर्यंत पोहचणे शक्य नव्हते. आपल्या गरजा आपण खेडयातच पुर्ण भागविल्या तर ब्रिटीश माल भारतात विकलाजाणार नाही. जर माल विकला गेला नाही व कच्चा माल विकत मिळाला नाही तर आपोआपच ब्रिटीशांचे साम्राज्य लयास जाईल. यासाठी खेडे समृध्द करुन त्यांना ज्ञानी, सक्षम, आत्मनिर्भर, स्वाभीमानी बनविणे हे गांधीचे ध्येय होते. खेडयाचा विकास झालातर विकसीत समाज आपोआपच इंग्रजांच्या साम्राज्याला उलथुन टाकेन या उद्देशाने म. गांधींनी गावा गावात आपले अनुयायी पाठविले व गावाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला हे बघत असतांना भारतीय ग्राम खरोखरच इतके सक्षम होते काय हे बघणे गरजेचे आहे.

ग्राम स्वराज्य कल्पनेत गांधीजींनी आदर्श खेडयाची कल्पना मांडली ते म्हणतात "अभी शहरो और कस्बों से भिन्न आपे सात लाख गाँवो के लिए सामाजिक, आर्थिक और नैतिक स्वतंत्रता प्राप्त करना बाकी है,"[१] या करीता या खेडयांची रचना, रचना बध्द असावी. अन्न, वस्त्र, निवारा हे सगळयांना स्वयंपुर्णतेने मिळाव्यात, प्रत्येक खेडयात पाणी पुरवठयाच्या सोयी, गुरांसाठी गोठे-कुरण, खेळाची मैदाणे, सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये, प्रार्थनागृह, समाज मंदिरे, प्राथमिक शाळा या गोष्टी अनिवार्य असाव्यात. प्रशासनाचे काम पंचायतीकडे असावे समाजातील सर्व स्थरातील लोकांना सुरक्षा व्यवस्था असावी. आणि जाती प्रथेला थारा नसावा.

आवश्यक गरजांच्या बाबतीत प्रत्येक खेडे स्वयंपुर्ण घटक व्हावे. अशी गांधींची कल्पना होती. उत्पादन, विनियोग व वितरण या तिन्ही क्रिया याच पातळीवर असाव्यात, "मेरी राय मे भारतकी और सारे विश्व कि आर्थिक रचना इसलिए ऐसी होनी चाहिए कि उसमे किसी मनुष्य को भोजन और वस्त्र के अभाव का कष्ट न भोगना पडे। दूसरे शब्दों मे, उसमें प्रत्येक मानव को पूरा काम मिलना चाहिए, ताकि वह अपना निर्वाह भली-भाँति कर सके। औरस यह ध्येय सर्वत्र तभी सिध्द किया जासकता है. जब जीवन की प्राथमिक आवश्यकताओं के उत्पादन के साधन होने चाहिए."[२] गांधीजींची ही कल्पना नवीन नसुन पुरातन भारतीय समाजव्यवस्थेतच रुढ होती. तीचे पुनरुज्जीवन होणे त्यांना आवश्यक वाटत होते. म्हणून महात्मा गांधीजींची ग्राम विकास संकल्पना स्पष्ट करण्याआधी प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक ग्राम संस्थेची पार्श्वभुमी आभ्यासणे आवश्यक आहे.

२. ग्राम संस्थांचा उदय :-

क) प्राचिन कालखंड :-

भारतीयांना ग्राम ही संकल्पना नवीन नाही. भारताचा अती प्राचिन ग्रंथ जो ऋग्वेद आहे. त्या ग्रंथात ग्राम संस्था असल्याचा उल्लेख सापडतो. त्यावेळी मात्र "समान कुळाच्या समुहास गाव म्हणत." गावाचा प्रमुख ग्रामीणी / ब्रजपती असे.

१. ग्राम :-
२. ग्रामणी :-
३. ग्रामपंचायत :-
४. ग्रामसभा :-[३]
५.

अ) ग्राम व्यवस्थेचे उगमस्थान :-

१) ग्राम :-

घराच्या समुहाला ग्राम (गाव) असे नाव आहे. भरताने ग्रामाची व्याख्या दिली आहे. ती अशी "विप्रादिवर्णप्राचा प्राकारपरिखादिरहिता बहुजनवसति" ब्राम्हणवादी वर्ण ज्यात प्रामुख्याने असतात अशी आणि तटबंदी व खंदक यांनी रहित जी पुष्कळ लोकांची वस्ती, तीला ग्राम म्हणावे, नवपाषाण युगापासून (सन पुर्व ८००० वर्षे) गावे अस्तित्वात असल्याचे कळते."[४]

ग्राम म्हणजे खेडेगाव व नगर म्हणजे शहर होय. वैदीक वाड्.मयात ग्राम शब्द अनेकदा आला आहे. वैदीक काळातील सर्व वस्ती गावातच होती. गावांना जोडणारे रस्तेही त्या लोकांची बांधलेली होती. त्या काळातले गाव स्वंयपुर्ण होते. गावात राहणारे लोक गावाला लागणारे अन्नधान्य स्वत:शेती करुन पिकवीत आणि दुधदुभत्यांसाठी गायीही बाळगीत. ते मेंढया पाळीत व त्यांच्या लोकरीपासून बनवीत. तसेच कपासची लागवड करुन ते त्यांची सुंदर तत्सम वस्त्रे विणीत. रथ व घरात लागणारे लाकडी सामान सुतार बनवीत. लोखंडी नांगर व त्यांचे फाळ लोहार तयार करीत, कुंभार गाडगी मडकी घडवीत. पाणी व मद्य ठेवण्यासाठी काही लोक अजिनाचे बुदले बनवीत. या कारुंशिवाय गावात न्हावी व वैदही असत.

गावाच्या सीमा दर्शविणारे दगड किंवा खंदक यांचा गावात अंतर्भाव होत असे. त्याचप्रमाणे गावाशी संबंध असलेले अरण्यही गावाचेंच एक अंग मानले जात असे. प्राचीन काळी सर्व जमीन राजाच्या मालकीची मानली जाई. एखाद्या वेळी राजा एखाद्या मानसावर खुष होऊन एखाद्यागावा संबंध्दीचे अधिकार त्याला देत असे. पण त्या गावाची संपुर्ण मालकी त्या माणसाकडे जाणे, ही कल्पना नंतरच्या काळातील म्हणजे शतपथ ब्राम्हणातील आहे. "आर्य काळात ग्रामपंचायत कारभाराविषयी बरीच माहिती उपलबध्द आहे. या काळात खेडयांचा कारभार बराच सुरळीत झाला होता असे विद्वानांचे मत आहे."[५]

राजकीय दृष्टीने किंवा कायद्याच्या दृष्टीने प्राचीन काळी ग्राम हा मुळघटक मानलेला नव्हता. गावातील लोकांचा संबंध राजाशी किंवा त्यांच्या वतीने अधिकार चालवणाऱ्या माणसाशी असे गावातील लोक राजाला आपल्या उत्पन्नाचा काही भाग कर म्हणून देत असत. गावाच्या प्रमुखाला "ग्रामणी"असे नाव होते. ही जागा फार मानाची समजली जाई. राजा आपल्या मर्जीतल्या माणसांची त्या जागेवर नेमणुक करी. इ.स. पुर्व ३२२/३२१ च्या सुमारास जेव्हां मौर्य साम्राज्याच्या उदय झाला त्यावेळी छोटी गणराज्य अस्त पावली. परंतु ग्राम व्यवस्था पुर्ण अस्त पावली असे म्हणता येणार नाही. 'प्राचीन ग्रामपंचायतीचा विकास नैसर्गिकरित्या झाला आहे.' लोकांच्या गरजेतून त्या अस्तीत्वात आल्या व विकसीत झाल्या आहेत त्यांचा कारभार रुढी, परंपरानुसार चाले. ग्रामप्रमुख हा आपल्या नावाप्रमाणेच गावांचा प्रमुख असे या ग्राम प्रमुखास वेदात ग्रामीणी असे संबोधले आहे.[६]

"कौटिल्याच्या काळातील गावे मोठी होती. दोन गावातील अंतर एक ते दोन कोस असे. एका गावात शंभरापासून पाचशेपर्यंत कुटूंबे राहत असत. गावात शेती करणाऱ्या लोकांची वस्ती जास्त असे. सर्वांची शेती एकमेकांना लागुन असत. शेतीला पाणीपुरवठा नदी, तलाव, विहीर इ. जलाशयातून होत असे. गावातील सुखसोयी प्रामुख्याने राजा निर्माण करीत असे. पण काही गावात लोकच हे काम करीत गावातील लोकांसाठी सरोवरे, विहीर, राजमार्ग, बागबगीचे इ. गोष्टी राजा निर्माण करीत असे. किंवा गावकऱ्यांना त्यासाठी आर्थिक मदत देत असे."[७]

जेव्हा एखादे गाव नव्याने बसवायचे असे त्या वेळी त्यात कोणकोणत्या सुखसोयी निर्माण करायच्या ते राजा प्रथम ठरवुन देत असे. "गावाची सीमा नदी, टेकडी, अरण्य, सरोवर किंवा तलाव यावरुन निश्चित केली जात असे. गावाच्या बाहेरच्या बाजुला शबर, पुलिंद, चांडाळ इ. लोकांची वस्ती असे."[८] शेतकऱ्यांची वस्ती त्यांच्या शेताजवळच असे. आणि शेतीला साहाय्यक अशा सुतार लोहार, गवळी, माळी इ. लोकांची वस्ती शेतकऱ्यांपासून थोडया अंतरावर एकत्र असे. शेतकरी व व्यापारी परस्पराच्या सोयी पाहत असत. व्यापारी लोक व्यापारात फार नफा घेत नसत शेती व व्यापार यातून जास्त पैसे मिळाल्यास शेतकरी व व्यापारी गावातील समाजासाठी मंदिरे, धर्मशाळा, पाणपोया, तलाव, विहीरी इ. निर्माण करीत. त्याच प्रमाणे आपल्या मिळकतीचा काही भाग ते दानधर्मातही वेचीत.

गावाचे जीवन सदैव पवित्र, "संतुलित व संचत राहावे यासंबंधी विशेष खबरदारी घेतली जात असे. गृहस्थजीवनाची रमणीयता ज्यायोगे भंग पावेत व लोकांच्या मनात विरक्तीचा उदय होईल, असे कोणतेही कृत्य गावात केले जाणार नाही. याची दक्षता घेतली जाई. कौटिल्याने संन्यासी व साधु यांच्या गावातील निवासावर निर्बंध घातले होते. त्यांना गावात एक दोन दिवस राहण्याची परवानगी दिलेली होती.

पण त्याच बरोबर लोकांनी त्यांच्या निकट सहवासात फार काळ राहु नये असाही कौटिल्याचा आदेश होता." गावात नाटक, तमाशा इ. खेळ मधुन मधुन करावयास त्याने तशा प्रकारच्या मंडळयांना परवानगी दिलेली होती. पण गावात त्यांचे कायम अड्डे निर्माण व्हावे, याला मात्र त्याचा सक्त विरोध होता.

प्रत्येक गावात गायींना चरण्यासाठी एक कुरण व गोठा असे. त्याच प्रमाणे प्रत्येक गावात दोन मोठे तलाव व अनेक विहीरी असल्याच पाहिजेत, असा नियम होता. ज्या गावात नदी नसेल, त्या गावात पाट काढून पाणी खेळवलेले असे

"प्रत्येक गावात यज्ञशाळा, मठ व मंदिरे असत. तिथे रोज संध्याकाळी धार्मिक चर्चा किंवा कथापुराणे चालत. गावाच्या चारी बाजुंना खंदक खणलेले असुन ते पाण्याने भरलेले असत. पाणी स्वच्छ रहावे. म्हणून त्यात जलचर प्राणी सोडलेले असत. गावात शिक्षणाचाही विशेष प्रचार होता. ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांना शिक्षण अपरिहार्य ठरवलेले होते. त्यावेळचे शिक्षण हे गुरुकुलात किंवा आचार्यकुलात होत असे."[९]

" 'मानसार' ग्रंथात गावांचे त्यांच्या आकारावरुन आठ वर्ग पाडलेले आहेत. ते असे १) दंडक, २) सर्वतोभद्र, ३) नंद्यावर्त, ४) पदमक, ५) स्वस्तिक, ६) प्रस्तर, ७) कार्मुक, ८) चतुर्मुख."[१०]

२) ग्रामणी :-

"गावाचा नेता याची व्याख्या अशी, 'ग्राम संवसथं तत्रज्ञान जनान नयाते दोषगुण विचारादिभी, परिचालयित प्रेरयति ना ', गावातील लोकांना गुणदोष विचारादी गोष्टींनी चालवतो किंवा त्यांना प्रेरणा देतो, तो ग्रामणी होय (मेदिनी), हे पद अनुवांशिक परंपरेने मिळत असे."[११] मात्र वारस अयोग्य असेल तर त्याच कुळातील दुसऱ्या व्यक्तीला ग्रामणी म्हणून नेमण्याचा सरकारला अधिकार असे. ग्रामणी बहुधा क्षत्रिय वर्गातला असे व तो ग्राम सेनेचा नायक असे. वैदिक काळी तो शासन आणि सरंक्षण या दोन्ही बाबतीत ग्रामाचा प्रमुख असे. त्याला नेहमी जागरुक राहावे लागे. या बाबतीत गावकऱ्यांनी त्याला सहकार्य न दिल्यास त्यांना दंड करण्याचा अधिकारही त्याला असे. सरकारी करांची वसुली करणे हे ग्रामणीचे दुसरे महत्वाचे कार्य होय. ग्रामपचांयतीच्या मदतीने तो हे काम पार पाडीत असे. तो ग्रामपंचायतीचा पदसिध्द अध्यक्ष होता. ऋग्वेदात ग्रामणीचा उल्लेख आहे (१०.६२.११) तसेच "वैदिक काळात जनता आपली गावे, पर्यावरण सरंक्षणाच्या दृष्टीने ग्रामसभा युध्दस्थल तसेच मातृभुमीच्या रक्षणासाठी व संवर्धनाच्या दिशेने सतत प्रयत्नशील असे. उत्तर वैदिक काळात पंचायत व्यवस्थेत बरेच बदल झालेत गावाच्या मुखियाला 'ग्रामिणी' असे नाव होते. प्रा. मॅकडॉनच्या मते ग्रामीण पद काही काळापर्यंत वांशिक होते. तर काही काळ त्याची नियुक्ती होत असे काही वेळा तो निवडुनही येत असे मात्र यासंबंधी पुरावा मात्र मिळत नाही."[१२]

३) ग्रामपंचायत :-

"गावाचा कारभार पाहणारी लोकायत संस्था ही संस्था पुरातन काळापासून भारतात प्रचलित आहे. अर्थात ग्रामपंचायत होती, तशीच द्रविडांतही होती."[१३]

भारतातील ग्रामीण जनता पुरातन काळापासून सुसंघटीत असल्याचे दिसते. गावातील पंचायती मार्फत ती आपले सर्व प्रश्न सोडवीत असे. गावावर पहारा बसवणे, गावाची सफाई करणे, रस्ते तयार करणे, त्यांवर पाणी शिंपडणे, औषधालये स्थापने, गावातील मंदिरे, तलाव व जंगले यांची व्यवस्था ठेवणे. इ. कामे पंचायतीकडे असतं. गावकऱ्यांच्या मनोरंजनासाठी संगीताचे कार्यक्रम व उत्सव घडवून आणणे हे ही ग्रामपंचायतीचे काम असे. ग्रामपंचायतीत लहान लहान उपसमित्याही असतं. ग्रामपंचायतीत चौकीदार, पुरोहित, शिक्षक, ज्योतीषी, सुतार, लोहार, कुंभार, धोबी, न्हावी, वैद्य व पटवारी इतक्या लोकांचा समावेश असे.

ग्रामपंचायती म्हणजे स्थानीक स्वराज्यचं होती. गावातील तंटे व भांडणे मिटवीणे हे ग्रामपंचायतीचे सर्वात महत्वाचे कार्य होय. गंभीर अपराधांची प्रकरणे तिच्या अधिकार कक्षेत येत नव्हती. पण दिवाणी प्रकरणांत मात्र तिच्या पुष्कळ अधिकार राजाकडून मिळालेले होते. भुमिकर वसुल करण्याचा अधिकारही ग्रामपंचायतीकडे होता. एक स्थायी निधी स्थापन करुन, ग्रामस्थांना अडीअडचणीला कर्जे देण्याची व्यवस्थाही पंचायती करीत असत. सांस्कृतीक, धार्मिक व साहित्यीक कार्यासाठीही ग्रामपंचायती मदत करीत.

या सर्व कार्यासाठी ग्रामपंचायतींना केंद्राकडून आर्थिक मदत मिळत असे. स्वत: कर बसविण्याचा अधिकारही ग्रामपंचायतीकडे होता. याशिवाय उदार धनिकाकडून द्रव्यसहाय्य मिळे ते निराळेच. या लोकाचत ग्रामसंस्था वेदकाळापासून पेशवाई अखेरपर्यंत जशाच्या तशा टिकुन होत्या. भारतीय लोकशाहीची बीजे या ग्रामपंचायतीत दिसून येतात, असे म्हटले जाते. पण डॉ. पु.ग. सहस्त्रबुध्दे यांना हे म्हणणे मान्य नाही. ते म्हणतात, लोकसत्ता ही मानवाच्या पृथगात्मतेतून व त्यांच्या व्यक्तिमहत्वातून निर्माण झालेली शासनपध्दती आहे. अहंकाराच्या या प्रबळ स्फुरणातून फार मोठे सामर्थ्य निर्माण होत असते. पण अशा तऱ्हेचे सामर्थ्य ग्रामपंचायतीच्या हजारो वर्षांच्या संस्कारानेही ग्रामीण जनतेत मुळीच निर्माण झाले नव्हते. तुकडोजी महाराज ग्रामगीता या ग्रंथात म्हणतात भारतातील बहुसंख्य जनता खेडेगावात राहत आहे. तेव्हा भारताची उन्नती व्हावयाची असेल तर या खेडेगावाची सर्वांगीण सुधारणा झाली पाहिजे. सध्या अज्ञान दारिद्रय, भोळया समजुती वगैरेनी गावातील जनता ग्रासली गेली आहे. तीच्या जीवनातील हर एक बाबी विषयी योग्य विचार तीच्यापुढे मांडून 'उध्दरेदात्मनात्मानय्' या रीतीने तीला स्वत:चा उध्दार करण्यास प्रवृत्त करावे, गावातील देऊळ, शाळा वगैरे ठिकाणी फुरसतीच्या वेळी गावकऱ्यांनी जमुन ग्राम विकासाचे कार्य करावे.[१४] इ.स.च्या ११ व्या शतकापासून भारतावर मुसलमानांची आक्रमणे सुरु झाली. संबध द. भारत पंधरा वीस वर्षात मुसलमानांनी पायतळी घातला. त्यांनी संपत्ती

लुटून नेली. स्त्रीया भ्रष्ट केल्या, मंदिरे पाडली व मुर्तीही फोडल्या. पण या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य ग्रामपंचायतींनी एकदाही प्रकट केले नाही. आपला देश व आपला धर्म यांच्या रक्षणासाठी आम्ही प्राणपणाने लढू ही वृत्ती ग्रामपंचायतीतून ग्रामीण जनतेत निर्माण झाली नव्हती, असेच म्हटले पाहिजे.

४) ग्रामसभा :-

प्राचिन काळापासून राज्याच्या शासन व्यवस्थेत ग्रामसभेला फार महत्वाचे स्थान आहे. पुर्वी नगरांची संस्था अगदी कमी असून, बहुतेक सर्व लोक ग्राम निवासीच होते. दळणवळणाची साधनेही त्या काळी चांगली नव्हती. त्यामुळे प्रत्येक ग्रामाची वेगळी स्वंयपुर्ण शासनव्यवस्था असे. "ग्रामच्या प्रमुखाला ग्रामणी हे नाव होते. तो ग्रामसभेच्या विचाराने गावाचा कारभार चालवी. गावातील सर्व सदगृहस्थ ग्रामसभेचे सदस्य असत. ग्रामसभेची कार्यकारी समिती म्हणजेच ग्रामपचांयत ही गावाचा कारभार पाहत असे. मध्य भारतातील पंचमंडळी व बिहारमध्ये ग्रामजनपद म्हणत या समितीत पाच सभासद असल्यामुळे तीला ग्रामपंचायत हे नाव मिळाले." [१५]

ग्रामव्यवस्थेची सर्व जबाबदारी ग्रामसभा व ग्रामपंचायत यांच्यावर असे. "केंद्रीय शासनाधिकारी ग्रामशासन संस्थेवर नियंत्रण ठेवीत. पण ग्रामसभेला विस्तृत अधिकार दिलेले असत. ग्रामाचे रक्षण, व राज्यकराची वसुली, स्वतःचे कर बसविणे, ग्रामस्थांची भांडणे मिटवणे, सार्वजनिक हिताच्या योजना हाती घेऊन त्या पार पाडणे, दुष्काळ व इतर संकटांचे निवारण करणे, पाठशाळा, अनाथालये, इ. स्थापन करणे. देवालयांच्या द्वारा विविध धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमांची व्यवस्था करणे इ. कार्ये ग्रामसभेच्या कक्षेत होती."[१६] ग्रामस्थांची भौतिक, नैतिक, आर्थिक व धार्मिक उन्नती यांचे श्रेय प्रामुख्याने ग्रामसभेला होते. प्राचिन भारतात शहरी करणाचा उदय झालेला नव्हता. तो खऱ्या अर्थाने मध्ययुगात झाला. संपुर्ण हिंदुकुशात एक संघ राजकीय सत्ता अस्तित्वात नसल्यामुळे कार्यक्षम प्रशासन व्यवस्था अस्तित्वात नव्हती. हिंदुकुशात लहान लहान सत्ता अस्तित्वात असल्यामुळे इस्लामी आक्रमणे प्रभावी ठरत होती. प्राचिन काळापासून म्हणजे बौध्द काळा नंतर व सम्राट अशोका नंतर बौध्द धर्माचा सर्वत्र प्रचार झाल्यामुळे सर्व हिंदुकुशात त्याग वृत्ती निर्माण झाल्यामुळे गावापुरते राज्य व्यवस्था निर्माण झाली समाज राजआश्रयातुन न राहता स्वतंत्ररित्या उदर निर्वाह करीत होते. थोडक्यात समृध्द ग्राम संस्था निर्माण झाल्या होत्या लोकांना लोकांवर राज्य करण्याची वृत्ती अस्तित्वात राहीलेली नव्हती. याचा दूष्यपरिणाम हिंदुकुशाला भोगावा लागला. व इस्लामी सत्ता अस्तित्वात आल्यात. भारतात ग्राम स्वातंत्र्यावर गदा आली. संपुर्ण हिंदुकुश ग्राम धार्जिना असल्यामुळे केंद्रीय सत्तेचा अभाव होता. भारतीय लोकांना ग्रामा पुरते जगण्याची परंपरा अस्तित्वात असल्यामुळे इस्लामी सत्ता मोठया प्रमाणावर वाढण्यास मदत झाली. इथुनच ग्राम व्यवस्थेचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. व शहरीकरण राजकीय केंद्रीय सत्ता प्रथा अस्तित्वास आली.

"सर्वसाधारणपणे त्यांच्याकडे राजकीय दृष्टीकोणाचा व व्यापक राष्ट्रीय भावनेचा अभाव होता. त्यांच्या लेखी देशभक्ती, मातृभुमी आणि राज्याचा संज्ञांचा अर्थ अतिशय संकुलित होता."[१७] परिणामी, त्यांच्यामध्ये सतत लढाया व वांशिक संघर्ष होत असतं.

ख) मध्ययुगीन कालखंड :-

मध्ययुगीन काळातही ग्राम प्रमुख, ग्रामसभा आणि खेडयातील इतर अधिकारी स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याचे आढळते. "गढवाल आणि कलचुरी शिला लेखात ग्रामपरिषदेचा उल्लेख सापडतो त्यास "महाजन सभा" असेही संबोधले आहे. ग्राम प्रमुखास महत्तवर, महंत किंवा पट्टालिका या नावानेही संबोधले आहे. तसेच काही ठिकाणी त्यास "ग्रामकुट" असेही संबोधले आहे."[१८] परंतु भारतातील प्रत्येक प्रातांचे थोडयाफार प्रमाणावर वेगवेगळे फरक ग्रामविषयक दिसुन येतात.

१) मोगल काळ :-

"'अबुल फजलने' आपल्या एन-ए-अकबरी या ग्रंथात कोतवालाच्या जबाबदारीचे वर्णन केलेले आहे. पोलीस विषयक न्यायविषयक व आर्थिक स्वरुपाचे कार्य तो करीत असे तसेच या जागेवर अनुभवी आणि उत्साही व्यक्तीची निवड केली जात असे."[१९] ग्रामीण स्थानिक शासनातही पुर्वापार पध्दतीने चालत आलेली पध्दत या काळात पुढे चाललेली दिसते. मोगल काळातही भारतातील ग्रामीण शासन व्यवस्था कार्यरत होती. या काळात राज्याची विभागणी प्रांतात केली जात होती. ज्यावर अमीर नावाचा अधिकारी कार्यरत असे प्रांताची विभागणी 'शिक' मध्ये केली होती जेथे शिकदार आजच्या जिल्हासारखा भाग म्हणजे परगाणा येथे अमंलगुजार असे अधिकारी कार्यरत होते. तत्कालीन गावांना 'भोगावर' मौजा असे संबोधले जात असे. गावच्या प्रमुखास मुखीया या नावाने संबोधले जाई तसेच देखरेखीसाठी पाटील किंवा मुकादम करवसुलीसाठी पटवारी व न्यायदानासाठी चौधरी अशा प्रकारची व्यवस्था मोगल कालखंडात होती." [२०] तसेच शिवकाळात व पेशवे काळात फार मोठे बदल झाले नाहीत. फक्त हुद्यावरील व्यक्तीचे नावे बदलतील परंतु त्यांचा हुद्दा व ग्राम व्यवस्थेची पध्दत मात्र बदललेली दिसत नाही.

२) मराठा काळ :-

मराठा रियासतीच्या काळात पाटील व देशमूख यांना गावे वतन दिलेल्याच्या अनेक सनदा उपलब्ध आहेत. खेडयाच्या प्रशासनासाठी पाटील जबाबदार असे. महसुल गोळा करणे व त्यातील काही वाटा राज दरबारी भरणे ते धान्य स्वरुपात असो किंवा अलुतेदार व बलुता यांनी

दिलेले असो. या सगळयांना त्यात समावेश असे. सुलतान, मुगल, व मराठे कालखंडात अबाधीतपणे चालत आलेल्या ग्रामीण शासन पध्दतीत काही किरकोळ अपवाद वगळता मध्ययुगात ही ग्रामीण शासन व्यवस्था तशीच्या तशी चालत आल्याचे आपल्याला दिसते मध्ययुगीत विविध श्रेणींना मात्र अलुतेदार व बलुता (बलुतेदार) असे संबोधु लागलेत.

ग) आधुनिक काळ (ब्रिटीश कालखंड) :-

भारतात प्राचिन काळापासून चालत आलेली ग्राम व्यवस्था मुसलमान राजवट सुरु होईपर्यंत ग्रामीण स्थानिक संस्था कार्यक्षम घटक म्हणून कार्यरत होत्या. परंतु कालांतराने हळु हळु का होईना एक संघ ग्रामीण समाज विस्कळीत होवु लागला ब्रिटीश काळात प्राचिन ग्राम संस्थांच्या ऱ्हासाला वेग आला अलुतेदार / बलुतेदार यांचा हस्त व्यवसाय ऱ्हास होवु लागला रेल्वे, तारायंत्रे, टपाल व्यवस्था व रस्ते बांधणी या सारख्या संस्थांचे महत्व कमी झाले. स्वंय:पुर्ण खेडयांचा ऱ्हास होऊ लागला. "जेम्स हॅडने स्पष्ट स्वरुपात लिहीले आहे की," या काळात पंचायती होत्या, परंतु त्या अवशेषांच्या स्वरुपात.[२१]

१२ मे १८८२ रोजी लॉर्ड रिपन याने एक ठराव प्रसिध्द करुन स्थानिक स्वराज्य संस्थांची मुहूर्तमेड पुन्हा रोवली. "म्हणून लॉर्ड रिपन यास भारतीय स्थानिक शासनाचा जनक म्हटले आहे."[२२] परंतु लॉर्ड रिपनने मांडलेल्या ठरावात ग्रामपंचायतीचा किंवा ग्रामाचा उल्लेख नव्हता त्यात तालुके किंवा तहसिल यांचाच संदर्भ होता. या ठरावातील शिफारशीनुसार विविध प्रांतांनी जे कायदे केलेत त्या अंतर्गत जिल्हा लोकल बोर्ड निर्माण झाले. जिल्हा लोकल बोर्डावर साने गुरुजी, बाळुभाई मेहता, शंकर श्रीकृष्ण देव, यांची वर्णी लागली या गांधीजींच्या शिष्यांची जिल्हा लोकल बोर्डावर वर्णी लागल्यामुळे ग्रामीण स्थानिक कारभाराची व्यवस्था पाहण्यासाठी मंडळे स्थापन करण्यात आली.[२३]

सन १९०७ साली स्थानिक शासन संबंधी शिफारसी करण्यासाठी रॉयल कमिशनची स्थापना करण्यात आली. ब्रिटीशांच्या शाही आयोगाने आपल्या अहवाल सन १९०९ मध्ये सादर केला या आयोगाने ग्राम संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी पुर्वी पेक्षा जास्त लक्ष दिले. आयोगाने खेडे स्थानिक शासनाच्या घटक मानला आहे. खेडे हा प्राथमिक घटक मानुन प्रत्येक खेडयांसाठी ग्रामपंचायत स्थापन करावी, ज्यात निर्वाचित सदस्यांचे बहुमत असेल व संस्था आर्थिक लोकाभिमुख बनतील.[२४]

ग्राम व्यवस्थेत लोकांचा सहभाग असावा हे जरी गृहितक असेल तरी ब्रिटीश आमदाणीत ग्रामपंचायत स्थापन्याचा उद्देश ब्रिटीशांचा लोक समुदाय व विकास नसून फक्त खेडयातील प्रशासकीय रचना निर्माण करावी एवढाच दिसतो. असा दृष्टीकोन ब्रिटीशांचा असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नव्हती. या पैकी स्थानिक स्वराज्याची मागणीची पुर्तता करण्याच्या दिशेने हिंदुस्थान सरकारने इ.स. १९१५ पासुन पावले टाकण्यास सुरुवात केली होती. "सन १९१५ साली सरकारने एक ठराव प्रसिध्द करुन निवडक खेडयात ग्रामपंचायत स्थापन कराव्यात व प्रत्येक ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयक व न्यायाविषयक अधिकारात सारखेपणा असल्याची गरज नाही असे म्हटले होते. पंचायतीचे कर विषयक अधिकार वाढविण्याची सुचना ठरावात होती. पंचायतींना जिल्हा बोर्डाची मदत असेल तर बोर्डाच्या पंचायतीवरील नियंत्रण राहण्याची तरतुद ठरावाने सुचविली होती."[२५]

या तरतुदी जरी ब्रिटीशांनी केल्या असल्यातरी त्या भारतीयांच्या वळणी पडल्या नव्हत्या, ग्राम व्यवस्थेचे पुर्वीचे स्वरुप व आजचे स्वरुप वेगवेगळे होतं. या ब्रिटीश पंचायत राजमुळे खऱ्या ग्राम व्यवस्थेचा ऱ्हास होत होता व होत आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीत व्यवहारी वृत्ती निर्माण झाली वस्तु विगोगाचे महत्व कमी झाले समाजातील व्यवस्था सामाजिक न राहत कागद स्वरुपाची होण्यास मदत झाली. परंतु ब्रिटीशांचा दृष्टीकोन प्रांतीक सरकारे स्वायत्व करावे असा होता. असे द हिस्टरी ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस, या ग्रंथात पट्टाभी सितारामय्या लिहतात. पट्टामी सितारामय्या हे कॉंग्रेसचे कार्यकर्ते असुन गांधींचे अनुयायी होते. ते ग्राम विकास धोरणाविषयी आग्रही होते. गांधीजींच्या ग्रामविकास धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पट्टाभी सितारमय्यां सारखे अनुयायी खान्देशात येवुन गेलेत. खान्देशातील अनेक अनुयायी टिळकांच्या विचारांनी प्रभावीत झाले असले तरी कालांतराने ते गांधी प्राणित अनुयायी म्हणून ओळखले जावु लागले. याच काळात ग्रामविकास करण्यासाठी कॉंग्रेस खऱ्या अर्थाने खेडयापर्यंत गेली ती फक्त गांधीयुगातच. म्हणून गांधींचे खरे कार्य ग्राम विकासच होते. आणि जे कार्य टिळकांचे गांधींनी पुढे चालविले ते स्वातंत्र्य चळवळीचे होते. स्वातंत्र्य आंदोलन व ग्रामविकास हे दोन्ही वेगवेगळे उद्देश टिळक व गांधी यांच्या चरित्रातुन दिसुन येतात. म्हणून मी या माझ्या संशोधनात गांधी पर्वातील ग्राम विकास या संकल्पनेचा अभ्यास करीत आहे.

३) निष्कर्ष :-

भारतीय ग्राम व्यवस्थेचा प्राचिन काळापासून या प्रकरणात अभ्यास केलेला असला तरी ग्राम व्यवस्था वेगवेगळया सत्त्याधिशांच्या काळात कमी जास्त प्रमाणात बदललेली दिसते तर ब्रिटीश काळात तिला कायद्या स्वरुप देण्याचा प्रयत्न होत असला तरी तो प्रयत्न राज्य व्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी होता. ग्रामीण उद्योगांची निर्मिती त्यात नव्हती उलट इंग्रजांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हस्तक्षेत्र करुन ग्राम व्यवस्था निकामी केली. त्याच ग्राम व्यवस्थेचे संगोपन गांधी अनुयायांना करणे हे मोठे कार्य त्यांच्या डोळयासमोर होते.

४.तळ टिपा :-

१) महात्मा गांधी, ग्रामस्वराज्य पृष्ठ क्र. १७

२) महात्मा गांधी, ग्रामस्वराज्य पृष्ठ क्र. २०
३) पं. महादेवशास्त्री जोशी (संपा) भारतीय संस्कृतीकोश मंडळ खंड-३ पृष्ठ-२४९)
४) कित्ता पृष्ठ क्र. २४०
५) दर्शनकर अर्जुनराव, पंचायत राज व नागरी, प्रशासन अनमोल मुद्रनालय पुणे, ११ तृत्तीयावृत्ती जुन १९९९ पृष्ठ-२४
६) कित्ता पृष्ठ क्र. २२
७) पं. महादेव शास्त्री जोशी (संपा) भारतीय संस्कृती कोश मंडळ, खंड-३ पृष्ठ-२४१
८) कित्ता
९) कित्ता
१०) कित्ता पृष्ठ क्र. २४२
११) कित्ता पृष्ठ क्र. २४१, २४२
१२) खैरनार रमेश गंगाराम, धुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत व्यवस्थेअंतर्गत झालेल्या आर्थिक, सामाजिक व राजकीय ग्रामीण विकासाचा चिकित्सक अभ्यास, पृष्ठ क्र.-२८
१३) पं. महादेव शास्त्री जोशी (संपा) भारतीय संस्कृती कोश मंडळ, खंड-३ पृष्ठ-२४९
१४) सावरकर सुदामनी (संपा) ग्रामगीता, राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज, बारावी आवृत्ती, पृष्ठ क्र. ३०
१५) पं. महादेव शास्त्री जोशी (संपा) भारतीय संस्कृती कोश खंड-३ पृष्ठ-२४९
१६) कित्ता पृष्ठ क्र. २४९
१७) मेहता जे.एल. अ.क्र. डॉ. व.क. देशपांडे खंड तिसरा मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास
१८) जोशी महादेव शास्त्री (संपा) भारतीय संस्कृती कोश मंडळ खंड-३ पृष्ठ क्र. २४
१९) कित्ता पृष्ठ क्र. २४
२०) खैरनार रमेश गंगाराम, धुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत व्यवस्थे अंतर्गत झालेल्या आर्थिक, सामाजिक व राजकिय ग्रामीण विकासाचा चिकित्सक अभ्यास पृष्ठ-३३
२१) जोशी महादेव शास्त्री (संपा) भारतीय संस्कृती कोश मंडळ खंड-३ पृष्ठ २८
२२) कित्ता पृष्ठ क्र. २९
२३) कित्ता पृष्ठ क्र. २९
२४) कित्ता पृष्ठ क्र. ३०
२५) तळवलकर गोविंद, सत्तांतर १९४७ मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती १५ ऑगष्ट १९९७ पृष्ठ क्र. ८२, ८३